प्रसिद्धी पत्रक
PRESS NOTE

CITY & INDUSTRIAL DEVELOPMENT CORPORATION OF MAHARASHTRA LTD.
Regd. Office: Nirmal, 2nd Floor, Nariman Point, Mumbai 400 021. Tel.: 91-22-6650 0900; FAX:91-22-6650 0933; www.cidcoindia.com
Head Office: CIDCO Bhavan, CBD Belapur, Navi Mumbai 400 614. Tel.: 91-22-6791 8241; Fax 91-22-6791 8294; email: mohan.ninawe@gmail.com

**दि. ०३.०३.२०२०**

**नेरूळ ते भाऊचा धक्का दरम्यान लवकरच जल प्रवासी सेवेस प्रारंभ**
**नेरूळ जेट्टीचे काम अंतिम टप्प्यात**

सिडकोच्या जल वाहतूक प्रकल्पांतर्गत लवकरच नेरूळ ते भाऊचा धक्का दरम्यान कॅटामरान सेवा सुरू होणार आहे. तसेच या प्रकल्पा अंतर्गत सिडकोतर्फे नेरूळ येथे उभारण्यात येत असलेल्या जेट्टीचेही काम अंतिम टप्प्यात आले आहे.

नवी मुंबईतील सार्वजनिक वाहतूक व्यवस्था अधिक सक्षम करण्यासाठी सिडकोतर्फे नेरूळ/सीवूड्स-उरण रेल्वे प्रकल्पा अंतर्गत उपनगरी रेल्वे सेवेचा उरण पर्यंत विस्तार, नवी मुंबई मेट्रो प्रकल्पांतर्गत चार मेट्रो मार्गांचा विकास इ. प्रकल्प साकारण्यात येत आहेत. या प्रकल्पांबरोबरच नवी मुंबई ते मुंबई दरम्यानच्या वाहतूक कोंडीवर मात करण्यासाठी सिडकोतर्फे पर्यावरणपूरक, तुलनेने कमी खर्चाचा, अधिक प्रवासी वहन क्षमता असणारा व अल्प कालावधीत विकसित करता येण्यासारखा जल वाहतुकीचा पर्याय विकसित करण्यात येत आहे. या अंतर्गत सिडकोतर्फे नेरूळ ३.०५ हेक्टर क्षेत्रावर येथे जल वाहतूक टर्मिनल प्रस्तावित आहे. टर्मिनल अंतर्गत पाइल्ड प्लॅटफॉर्मवर टर्मिनलला जोडणारा रस्ता, टर्मिनलची इमारत, पार्किंग लॉट, युटीलिटीज् (इलेक्ट्रिकल पॅनेल रूम, वॉटर टँक, एसटीपी इ.) नेव्हीगेशनल एरिआ आणि मार्शलिंग एरिआ विकसित करण्याचे काम प्रगती पथावर आहे. जल वाहतूक टर्मिनल अंतर्गत उभारण्यात येणाऱ्या जेट्टीचे काम प्रगतीपथावर असून ते अंतिम टप्प्यात आले आहे.

राज्य शासनातर्फे मुंबईच्या पूर्व किनारपट्टी प्रदेशात जल वाहतुकीकरिता सोयी सुविधा विकसित करण्याकरिता नोड्ल एजन्सी म्हणून महाराष्ट्र मेरिटाइम बोर्डाची नियुक्ती करण्यात आली आहे. यानुसार महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड, मुंबई पोर्ट ट्रस्ट आणि सिडको ही महामंडळे आपापल्या कार्यक्षेत्रात सागरी वाहतूक सुविधा विकसित करत आहेत. त्यानुसार सिडको व मेरिटाइम बोर्ड यांच्या माध्यमातून वाशी, नेरूळ व बेलापूर येथील खाडी किनारी जेट्टी उभारणे प्रस्तावित आहे. त्यांपैकी नेरूळ येथील जेट्टीचे काम अंतिम टप्प्यात आले आहे. एप्रिल २०२० पर्यंत हे काम पूर्ण होणे अपेक्षित आहे, तर मे २०२० मध्ये प्रत्यक्ष जल वाहतूक सेवा सुरू करणे नियोजित आहे. या प्रकल्पाकरिता सिडकोतर्फे रु. १११ कोटींची तरतूद करण्यात आली आहे.

कॅटामरान सेवेमुळे नेरूळ ते भाऊचा धक्का हा प्रवास सागरी मार्गे केवळ ३० मिनिटांत करता येणे शक्य होणार आहे. तसेच दक्षिण मुंबईतून प्रस्तावित नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळापर्यंत लवकरात लवकर पोहोचण्यासाठीही ही सेवा उपयुक्त ठरणार आहे.

- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -

मा. संपादक महोदय,
वरील बातमीस आपल्या लोकप्रिय वर्तमानपत्रातून ठळक प्रसिद्धि देऊन उपकृत करावे, ही विनंती.

**जनसंपर्क विभाग, सिडको**